महानिर्मिती/ आ.अ.(मा.सं.-२)/र व का

**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित**

प्रकाशगड, बांद्रा (पुर्व) मुंबई ५१

## प्रशासकीय परिपत्रक क्र ६९ दिनांक ०७.०५.२००९

विषयः- महानिर्मिती कंपनी मधील अधिकारी/ कर्मचारी यांना वाढीव दराने महागाई भत्ता मंजुर करणे.

महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या आधारे तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुनर्रचित महानिर्मिती कंपनीच्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित दराने महागाई भत्ता मंजुर केला जातो.

२. आता महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक मभवा-११०९/प्र.क्र.७०/सेवा -९/दिनांक २/५/२००९ अन्वये महाराष्ट्र शासनाने, शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१.०१.२००९ पासुन सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर १६ टक्के ऐवजी २२ टक्के या सुधारित दराने महागाई भत्ता मंजुर केला आहे. म्हणजेच महागाई भत्त्याच्या दरात ६ टक्के वाढ केली आहे.

३. शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीमर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना मुळ वेतनाच्या १०४ टक्के ऐवजी ११० टक्के दराने दिनांक ०१.०१.२००९ पासुन महागाई भत्त्यात वाढ देण्याबाबत प्रशासकीय परिपत्रक्र १ दिनांक १९.१०.२००५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मा. व्यवस्थापकीय संचालक (महानिर्मिती) यांनी संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन मंजुरी दिली आहे.

४. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंबंधातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे तशाच यापुढेही लागु राहतील.

५. ११० टक्के अशा सुधारित दराने मंजुर केलेल्या महागाई भत्त्याची रक्कम महानिर्मिती कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे मे २००९ च्या वेतनामध्ये समाविष्ट करण्यात यावी व दिनांक ०१.०१.२००९ ते ३०.०४.२००९ या चार महिन्याची थकबाकीची माहे मे २००९ च्या वेतनासोबत अदा करण्यात यावी.

६. संबंधित अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी महागाई भत्त्याची वाढीव रक्कम प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेल्या निधीसाठी महाव्यवस्थापक (अर्थोपाय विभाग), महानिर्मिती, प्रकाशगड २ रा मजला, वांद्रे, मुंबई ५१ यांचेकडे त्वरीत मागणी करावी.

**मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.)**

प्रत,

महानिर्मिती कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे